# मासेमारी हाक्का करिता तलावाचा जाहीर लिलाव प्रसिद्धी पत्रक

डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठा अंतर्गत येत असलेल्यां मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर येथील तलावाचा मासेमारी हक्का करीता लिलाव खालील दिलेल्या तारखेस आयोजित करण्यात आलेला आहे

| विभागाचे नाव :- | लिलावाची तारीख आणि वेळ |
| --- | --- |
| १. अन्वी, २.रंभापूर, ३.पैलपाडा | १७.०६.२०२० स.११.०० वा. |

**जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे**

1. जाहीर लिलाव ठरलेल्या ठिकाणी, तारखेस व वेळेवर होईल.
2. लिलावात बोली बोलण्यास रु 25000/- अग्रिम रक्कम जमा करावी लागेल अन्यथा बोली बोलता येणार नाही.
3. अग्रिम रक्कम रु 25000/- ज्यांनी तलाव घेतला असेल त्यांच्या लीलावच्या रकमेत वळती करण्यात येईल व इतरांची रक्कम त्याच ठिकाणी परत करण्यात येईल.
4. लीलावाची बोली संपताच लीलावाची संपूर्ण रक्कम त्याच वेळी भरावी लागेल अन्यथा अग्रिम रक्कम जप्त करण्यात येईल.
5. वरील अटीचे उल्लंघण झाल्यास समिति एकतर्फी निर्णय घेऊन लीलावातून मूक्त होईल.
6. दिनांक 31.03.2021 पर्यंतच मासेमारीचा हक्क राहील त्यानंतर कोणताही हक्क राहणार नाही.
7. तलावास योग्य किमत न मिळाल्यास लिलाव रद्द करण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा अधिकार समितीस राहील.
8. सदर तलाव सपूर्णत: नैसर्गिक पाण्यावर अवलंबून आहे जाहिर लिलावाच्या दिवशी या तलावात जेवढे पाणी जमा झाले आहे त्या शिवाय विद्यापीठा तर्फे पाण्याची पातळी वाढविणे करिता कोणत्याही प्रकारचा पाणी पुरवठा करण्यात येणार नाही याचे नोंद घ्यावी.
9. तलावाचे संपूर्ण संरक्षण तलाव घेतल्यास स्वता करावे लागेल व आसं पासच्या अवगमनास अडथळा होणार नाही ही दक्षता घ्यावी लागेल.
10. तलावातून गेलेल्या विद्युत तारा व विद्युत खांब या बाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी लिलाव झालेल्या तलावाचा कालावधी जून 2020 ते मार्च 2021 राहील त्या दरम्यानच्या कालावधीत 24 तास चौकीदार ठेवणे अनिवार्य राहील अन्यथा करार संपुष्टात येईल. तसेच या दरम्यान कोणत्याही प्रकारची दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी लिलाव घेणाऱ्याची राहील. त्यास प्रक्षेत्र जबाबदार राहणार नाही
11. प्रक्षेत्रा करिता वेळोवेळी ,पाण्याचा वांपर पिकाकरीता केल्या जाणार आहे त्यामुळे पाण्याची पातळी कमी झाल्यास त्याबद्दल तक्रार करता येणार नाही.
12. तलावातील मासेमारी संदर्भातील योग्य उपाय योजना लिलाव घेणाऱ्याची राहील त्यासंदर्भात प्रक्षेत्राची जबाबदारी राहणार नाही.

२८/५/२०

**मुख्य बिजोत्पादन अधिकारी**
**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र**
**वणी रंभापूर**